अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.८७/२०२३
जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/८४७० दि. ०८/११/२०२३

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका**

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/८७/२०२३

प्रति,

श्री.अतिश अडागळे

४२५/२६, औद्योगिक वसाहत,

गुलटेकडी, पुणे-४११०३७

यांस

----------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.अतिश अडागळे, ४२५/२६, औद्योगिक वसाहत, गुलटेकडी, पुणे-४११०३७ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.०७/०८/२०२३ रोजी (आ.क्र.८०३५, दि.०७/०८/२०२३) अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/६०५१, दि.०४/०९/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०४/०८/२०२३ | ०७/०८/२०२३ | ०६/०९/२०२३ | ०४/०९/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी "श्री.माधव जगताप यांनी महिलांवर अत्याचार केलेबाबतची माहिती उघड होऊ नये म्हणून माहिती देण्याचे टाळल्याने' असे अर्जात नमूद करुन दि.१८/१०/२०२३ रोजी (आ.क्र.११९४३ दि.१८/१०/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १८/१०/२०२३ | १८/१०/२०२३ | ०३/१०/२०२३ | नाही | नाही |

अपिल दिनांक ०३/११/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दि.०१/११/२०२३ रोजी दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत संपर्क साधला आहे. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते .

## विवेचन

अपिलार्थी यांनी "श्री.माधव जगताप यांनी महिलांवर अत्याचार केलेबाबतची माहिती उघड होऊ नये म्हणून माहिती देण्याचे टाळल्याने" असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/६०५१, दि.०४/०९/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | माहितीचे मुद्दे | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| 1. | आवश्यक माहितीचा विषय- श्री.माधव जगताप (उपआयुक्त) यांनी महिलांवर अत्याचार केलेबाबत.<br>आवश्यक माहितीचा कालावधी-सन २०१६ ते २०२३<br>आवश्यक माहितीचा तपशील-<br>अ)महिलेवर अत्याचार केलेबाबत सन २०१६ नंतर निलंबित केले होते.याची नोंद श्री.जगताप यांचे वार्षिक मुल्यांकन अहवाल येथे केली आहे किंवा कसे याची माहिती मिळावी. | सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण 2012/989/प्र.क्र.479/सहा, मंत्रालय मुबंई दि. 17/10/2014 मधील तरतुदीनुसार शासकीय कर्मचारी /अधिकाऱ्यास त्याच्या सेवाकालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश, त्याच्या सेवानियमा अंतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल या सारखी वैयक्तिक तपशीला संबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकारावर नसल्याचा निर्णय स्पेशल लिव्ह पिटीशन क्र. 27734/2012 दि.3/10/2012 रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. |
| | ब)पदाचा गैरवापर करून श्री.जगताप यांनी पुणे मनपाचे अन्य खात्यात एकूण किती महिलांवर अत्याचार केले आहे याची माहिती मिळावी. | मुद्दा क्र.१ प्रमाणे. |
| | क)श्री.जगताप यांनी सन २०१६ नंतर महिलांवर अत्याचार केलेबाबत नोंद वार्षिक गोपनीय अहवालात केली आहे किंवा कसे याची माहिती मिळावी. | मुद्दा क्र.१ प्रमाणे. |
| | ड)महिलांवर अत्याचार करणारे श्री.जगताप यांना सुरक्षा विभागाचा कार्यभार देताना त्यांनी महिलांवर केलेल्या अत्याचाराची बाब विचारात घेतली किंवा कसे याची माहिती मिळावी. | मुद्दा क्र.१ प्रमाणे. |
| | इ)श्री.जगताप यांनी अन्य विभागातील महिलांबाबत असे वर्तन केल्याची चौकशी करण्या त आली आहे किंवा कसे याची माहिती मिळावी. | मुद्दा क्र.१ प्रमाणे. |

श्री.जगताप यांचे वार्षिक मूल्यमापन अहवालात निलंबनाबाबत नमूद करण्यात येत नसल्याचे व काही अत्याचार झालेल्या महिला तक्रार देण्यास घाबरतात अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. मुद्दा क्र.१(अ) व १(क) बाबत वार्षिक मूल्यमापन अहवालात निलंबनाबाबत नोंद होत नसून सेवापुस्तकामध्ये अशा प्रकारच्या नोंदी होतात. मूल्यमापन अहवालात फक्त केलेल्या कामनुसार गुणांकन देण्यात येते. लागू मुद्दयांबाबत स्पष्ट उत्तर होय/नाही स्वरुपात द्यावीत. मुद्दा क्र.१(ब) बाबतची माहिती व्याख्यात येत नाही. अभिलेखे उपलब्ध आहेत किंवा नाही असे स्पष्ट उत्तर देणे अभिप्रेत आहे असे अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच, अभिलेख उपलब्ध करुन देताना सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण 2012/989/प्र.क्र.479/सहा, मंत्रालय मुबंई दि.१७/१०/२०१४ मधील तरतुदीनुसार शासकीय कर्मचारी /अधिकाऱ्यास त्याच्या सेवाकालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश, त्याच्या सेवानियमा अंतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल या सारखी वैयक्तिक तपशीला संबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकारावर नसल्याचा निर्णय स्पेशल लिव्ह पिटीशन क्र. 27734/2012 दि.3/10/2012 रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे यातील तरतूदीचा विचार करावा, असे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे, महानगरपालिका यांनी दिलेले उत्तर योग्य आहे तथापि त्यांनी अपिलार्थी यांना माहिती लागू असेल त्याप्रमाणे होय/नाही स्वरुपात कळवावी. अभिलेख स्वरुपात माहिती उपलब्ध आहे किंवा नाही ते स्पष्ट नमूद करुन देण्यात यावेत. त्यानुसार, सदर अपिल क्र.८५/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

6/11/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.